शिक्षा मंडल वर्धा द्वारा संचालित

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी –वर्धा.

(हिंदी भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त)

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

स्थापना १९६१, नॅक द्वारा मानांकन 'अ' श्रेणी

फोन नं. : ०७१५२–२३०५१८, २३०११० फॅक्स : ०७१५२–२३०५१८

email : sjgs_pw@rediffmail.com Website : www.sjgsm.shikshamandal.org.




# माहिती पत्रक
# २०२०-२०२१

## शिक्षा मंडल द्वारा संचालित महाविद्यालये

गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालय, वर्धा –१९४०

गोविंदराम सेकसरिया वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, नागपूर –१९४५

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा –१९६१

कृषी विज्ञान संस्था रुरल इन्स्टिट्यूट, पिपरी–वर्धा –१९६२

जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा –१९६८

रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी–वर्धा –२००३

बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिपरी –वर्धा –२०१७



सामुदायिक विस्तार विभाग,परसबाग प्रकल्प



सामुदायिक विस्तार विभाग,परसबागेची निगा



विद्यापीठस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन



शिक्षा मंडल स्पर्धेत पुरस्कार प्राप्त विद्यार्थी



जागरदिंडी रासेयो विशेष शिबिर पानवाडी



फळ प्रक्रिया उद्योग कार्यशाळा



बिल्डिंग मेन्टेन्स विभाग, प्रकल्प



सामुदायिक विस्तार विभाग, प्रक्षेत्र भेट

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

(हिन्दी भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था)

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी – वर्धा

स्थापना १९६१

नॅक मानांकन 'अ' श्रेणी

## ग्रामीण सेवा व त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व उपक्रमासाठी शिक्षण देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठातील एकमात्र महाविद्यालय

## महाविद्यालयाची उद्दिष्टये–

★ ग्रामीण क्षेत्रात उच्च शिक्षणाची सोय करणे.★

★ विद्यार्थ्यांना निकोप स्पर्धासाठी सक्षम करणे. ★

★ ग्रामीण उत्थानासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे. ★

★ शिक्षण –संशोधान –विस्तार या तत्वांचा अवलंब करणे. ★

★ महाविद्यालयाच्या विकासात सर्व घटकांना सहभागी करणे. ★

★ देशभक्ती, राष्ट्रीय भावना आणि श्रमप्रतिष्ठा यांची जोपासना करणे. ★

| महाविद्यालय विकास समिती (वरिष्ठ महाविद्यालय) | | कनिष्ठ महाविद्यालय शाळा समिती | |
|---|---|---|---|
| श्री.राहुल बजाज,पुणे अथवा | अध्यक्ष | श्री.राहुल बजाज,पुणे अथवा | अध्यक्ष |
| श्री.संजय भार्गव,पुणे | सभापती | श्री.संजय भार्गव,पुणे | सभापती |
| श्री.पी.डी.खेमूका,वर्धा | सहसचिव | श्री.पी.डी.खेमूका,वर्धा | मनोनित सदस्य |
| प्रो.रामप्रसाद गौतम,वर्धा ) (शैक्षणिक) | मनोनित सदस्य | प्रा.(श्रीमती) किरण जाजू , वर्धा | मनोनित सदस्य |
| प्रा.(श्रीमती)माला माथुर,वर्धा (समाजसेविका) | मनोनित सदस्य | प्रा.हरीश भूतडा | मनोनित सदस्य |
| श्री.सतिश बावसे (माजी विद्यार्थी) | मनोनित सदस्य | श्री.एम.जी.येल्टीवार | शिक्षक प्रतिनिधी |
| श्री.विनेश काकडे (संशोधन) | मनोनित सदस्य | डॉ.पी.एम.कालभुत | प्राचार्य / सचिव |
| डॉ. आर.के.मून | शिक्षक प्रतिनिधी | श्री.रामप्रसाद गौतम,वर्धा | विशेष निमंत्रित |
| डॉ.व्ही.आर.उगले | महिला शिक्षक प्रतिनिधी | डॉ.बी.के.सोनटक्के अधिष्ठाता (कृषी) शिक्षा मंडल | विशेष निमंत्रित |
| श्री.एस.व्ही.फुलझेले | शिक्षकेतर प्रतिनिधी | | |
| डॉ.आर.आर.चौधरी | समन्वयक आय.क्यु.ए.सी. | | |
| | विद्यार्थी प्रतिनिधी | | |
| डॉ.पी.एम.कालभुत | प्राचार्य/सचिव | | |
| श्री.भूपेंद्र लोहिया,वर्धा | विशेष निमंत्रित | | |
| डॉ.बी.के.सोनटक्के अधिष्ठाता (कृषी) शिक्षा मंडल | विशेष निमंत्रित | | |

# आमची मातृसंस्था

शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेची जपणूक करीत राष्ट्रीय व मानवी मूल्यांचा अंतर्भाव असलेले शिक्षण अत्यंत माफक दरात देण्याचे कार्य शिक्षा मंडल निरंतर करीत आहे.शिक्षा मंडल आपल्या उच्च परंपरांबद्दल जागरुक आहेच,त्याचबरोबर शैक्षणिक विकासाच्या बाबतीत आधुनिक दृष्टिकोन बाळगणारे आहे.

शिक्षणाचे माध्यम सामान्यतःइंग्रजी असले तरीही आमच्या वाणिज्य महाविद्यालयात हिंदी व मराठी या माध्यमातूनही शिक्षण दिले जाते.संस्थेची सर्व महाविद्यालये विस्तीर्ण परिसर व उत्तम सोयी – सुविधांनी समृध्द आहेत.बहुतांशी महाविद्यालये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्न असून सातपैकी सहा महाविद्यालयांना शासनाचे अनुदान प्राप्त झाले आहे.२०१५ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शिक्षा मंडलचा **आदर्श शिक्षण संस्था पुरस्कारान** गौरव केला आहे.

शिक्षा मंडल द्वारा संचालित सर्व अनुदानित महाविद्यालयांचे मानांकन व मूल्यांकन झालेले आहे.जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा College with Potential for Excellence हा दर्जा प्राप्त झालाअसुन जैवतंत्रज्ञान विभाग,भारत सरकार नवी दिल्ली द्वारा 'Star College' हा सन्मान प्राप्त झाला आहे.असा सन्मान प्राप्त झालेले हे विदर्भातील एकमेव महाविद्यालय आहे.या महाविद्यालयाला नुकतीच नॅक द्वारा A श्रेणी प्राप्त झाली आहे.त्याच प्रमाणे कृषी महाविद्यालयाला 'A' श्रेणी व तंत्रशिक्षण महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळद्वारा उत्कृष्ट तंत्रशिक्षण महाविद्यालय हा दर्जा प्राप्त झाला आहे.

संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांतील ग्रंथालये उत्तम ग्रंथांनी समृध्द आहेत.गो.से.वाणिज्य महाविद्यालय, नागपूर व जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा येथील ग्रंथालयांमध्ये ३०,००० पेक्षा जास्त ग्रंथ उपलब्ध आहेत.या व्यतिरीक्त प्रत्येक महाविद्यालयांत Broadband Internet सुविधा असलेले संगणक कक्ष सर्वांकरीता उपलब्ध आहेत.सध्या संस्थेच्या सर्व महाविद्यालयांत ९००० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यापैकी ५२ टक्के विद्यार्थीनी आहेत.५० आचार्य पदवी (Ph.D) प्राप्त अध्यापकांसह एकुण २९० अध्यापक विद्यार्थ्यांना अध्यापनाचे कार्य करीत आहेत.विद्यार्थी, विद्यार्थीनी व अध्यापकांद्वारा प्राधान्यता लाभलेली शिक्षण संस्था असल्याचा शिक्षा मंडलला सार्थ अभिमान आहे.

या संस्थेत विद्यार्थ्यांकरीता ११ वी ते आचार्य पदवी (Ph.D) पर्यतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.संस्थेने पारंपारिक अनुदानित अभ्यासक्रमांसोबतच M.B.A.सारखे विनाअनुदानित अभ्यासक्रमही उपलब्ध करुन दिलेले आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता संगणकशास्त्र व इंग्रजी संवाद कौशल्य यासारखे प्रमाणपत्र,अभ्यासक्रम,स्पर्धापरीक्षा Chartered Accountancy (C.A.)आणि Company Secretary (C.S.)यांसारखे प्रमाणपत्र अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा यांसारख्या परीक्षांचे विशेष मार्गदर्शन वर्ग सुरु केले आहे.

शिक्षा मंडल द्वारा संचालित महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेना,क्रीडा व इतर कार्यक्रमांची उत्तम परंपरा निरंतर राबविण्यात येते.गेल्या ४० वर्षापासून ग्रामविकासाच्या कार्यात सक्रीय योगदान देणारी आमची शिक्षा मंडल ही संस्था १९८४ पासून ग्रामविकास तंत्रशिक्षण योजनेअंतर्गत रोजगाराभिमुख

व्यावसायिक प्रशिक्षणाचे कार्य यशस्वीपणे राबवीत आहे.

संस्थेतील विद्यार्थी शिक्षण क्रीडा व इतर क्षेत्रांमध्ये सतत नावलौकिक मिळवितात.संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये स्व.श्री.मधुकरराव चौधरी (माजी सभापती,महाराष्ट्र राज्य),श्री.हरीश साळवे,श्री.नितीन गडकरी,श्री.उदयन सेन (CEO of Deloitte) श्री.जयदीप शाह (माजी अध्यक्ष, आय.सी.ए.आय.),श्री.रमेश चांडक (व्यवस्थापक संचालक के.ई.सी.इंटरनॅशनल) ही नावे उल्लेखनीय आहे.

## शिक्षा मंडल : एक दृष्टिक्षेप

शिक्षा मंडल ही स्वातंत्र्यपूर्व भारताची अघोषित राजधानी असलेल्या वर्धा शहरात शंभर वर्षापूर्वी स्थापन करण्यात आलेली एक अग्रगण्य शिक्षण संस्था आहे.भारतीय स्वातंत्र्य संग्राम व म.गांधीच्या विचारांचा प्रभाव असणाऱ्या या संस्थेची स्थापना श्री.जमनालाल बजाज यांनी १९१४ साली केली.या संस्थेतील विद्यार्थी व शिक्षक भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते. स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे संस्थेचे एक विद्यालय इंग्रजांनी बंद केले होते. भारताची पहिली शिक्षण परिषद १९३७ साली शिक्षा मंडल येथे म.गांधींच्या अध्यक्षतेत घेण्यात आली.या परिषदेतील विचार मंथनातच बुनियादी /नयी तालीम ची संकल्पना उदयास आली.

विद्यार्थ्यांचे वसतिगृह उभारण्यापासून सुरुवात झालेल्या या संस्थेने १९१९ मध्ये वर्धा येथे एका शाळेची स्थापना केली.पुढे १९४० साली वर्धा येथेच वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करुन संस्थेने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले.नंतर १९४५ साली मध्ये नागपूर येथे वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना व त्यापाठोपाठ वर्धेजवळील पिपरी येथे '' रुरल इन्स्टिट्यूट ची स्थापना'' करण्यात येऊन त्याद्वारे ग्रामीण सेवा शिक्षण,तंत्रविज्ञान व कृषिविज्ञान असे तीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.कालांतराने हे अभ्यासक्रम तीन स्वतंत्र शाखा म्हणून संबंधित विद्यापीठांशी संलग्न झाल्या व नावारुपाला आल्या.पुढे १९६२ साली संस्थेने वर्धा येथे विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. २००३ साली संस्थेचे रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय स्थापन केले.२०१७ साली बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सुरु झाले.

शिक्षा मंडल चे अध्यक्षपद बजाज परिवारातील सदस्यांनीच भूषविले असून सध्या बजाज ऑटो लिमिटेड या उद्योग समूहाचे अध्यक्ष मा.श्री.राहुल बजाज हे शिक्षा मंडलाचे अध्यक्ष आहेत.

## आमचे उद्दिष्टये :

'आदानंहि विसर्गाय' अर्थात 'जे संपादित केलेले आहे.त्याचा लाभ इतरांपर्यत पोहचविणे'.

## आमचे उद्देश्य :

राष्ट्रउभारणीच्या कार्यात शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेउन शिक्षा मंडलने शैक्षणिक संस्थांची स्थापना केली.ज्या हेतूने आम्ही या संस्था उभारल्या तो हेतू आणि त्या हेतू प्रती असणारी बांधिलकी याचे महत्व आजही कायम आहे.शिक्षा मंडल चा उद्देश विद्यार्थ्यामध्ये शिक्षणक्षमता व कौशल्यांचा विकास करणे ,नितीमूल्यांची जोपासना करुन ती विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे हा आहे.

## आमची मूल्ये :

अध्यापन हा केवळ व्यवसाय नसून समर्पित वृत्तीने करावयाचे पवित्र कार्य आहे.असे मानणारे अध्यापक आणि स्वतःमधील कौशल्ये व सुप्तगुणांना उन्नत करण्याची उर्मी बाळगणारे विद्यार्थी हे कोणत्याही आदर्श शैक्षणिक संस्थेचे अधिष्ठान असते.शिक्षा मंडल ही अशीच ध्येयनिष्ठ अध्यापक व विद्यार्थी असलेली व अशांकरिताच असणारी संस्था आहे.

गुणवत्ता व प्रामाणिकता ही आमच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची मूल्ये असल्यामुळे त्या मूल्यांना नेहमीच प्रोत्साहित करण्यात येते.त्याचबरोबर सर्वाप्रती न्यायपूर्ण असणे हे सुध्दा आम्हाला तितकेच महत्वाचे वाटते.

कोणतेही कार्य करताना साधेपणा आणि काटकसर याला आम्ही नेहमीच प्राधान्य देतो.तसेच श्रमप्रतिष्ठा,कठोर परिश्रमातील आनंद,निर्भिडपणा व सामाजिक बांधिलकी ही मूल्ये रुजविण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न करतो.

सर्वात प्रथम मानवता,नंतर राष्ट्र, त्यानंतर संस्था व शेवटी व्यक्ती हा प्राधान्यक्रम लक्षात घेऊनच संस्थेतील प्रत्येकाने कार्य करावे असा आमचा दृष्टिकोन आहे.सर्वांना समान संधी मिळायला हवी.यावर आमचा विश्वास असल्यामुळे कोणत्याही गुणवान विद्यार्थ्याला केवळ पैश्यांअभावी आमच्या संस्थेत प्रवेश नाकारला जात नाही.आम्ही केवळ हुशार विद्यार्थ्यांच्याच शैक्षणिक विकासाकडे लक्ष देत नाही.तर कमजोर विद्यार्थ्यांच्या बौध्दिक प्रगतीकरीतासुध्दा विशेष प्रयत्न करतो.स्वतःच्या उन्नतीकरीता प्रामाणिकपणे धडपडणाऱ्या प्रत्येकाला शिक्षा मंडल नेहमीच मदतीचा हात देते.

## आमची शैक्षणिक उद्दिष्टये :

१) १०० टक्के विद्यार्थ्यांचा निकाल २. १०० टक्के विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

३) १०० टक्के विद्यार्थी चारित्र्यसंपन्न ४. १०० टक्के विद्यार्थी नोकरीकरीता पात्र

या सर्व मूल्यांचे प्रतिबिंब आपल्या वर्तनातून निरंतर प्रतीत व्हावे याकरिता शिक्षा मंडल परिवारातील सर्वसदस्य बांधील आहे.

## आमचे महाविद्यालय :

१९६१ साली स्थापन झालेले रुरल इन्स्टिस्ट्यूट १९७० साली नागपूर विद्यापीठाशी कॉलेज ऑफ रुरल सर्व्हिसेस या नावाने संलग्न झाले.पुढे १९९१ साली महाविद्यालयाचे श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय असे नामकरण करण्यात आले.ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्दिष्टपूर्तीकरीता आमचे महाविद्यालय कटिबध्द आहे.ग्रामीण सेवा अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्रातील इतर संस्था एकतर लयास गेल्या आहेत किंवा त्यांनी पारंपारिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या इतर संस्थामध्ये आपले रुपांतरण केले आहे.परंतु आमच्या श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित झाल्यावरही आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे.म्हणूनच ग्रामीण सेवा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या राबविणारे केवळ विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

उच्च शिक्षण,संशोधन व विस्तार कार्य या तीन मुख्य आधारांवर आमचे महाविद्यालय सक्षमपणे उभे आहे.सामुदायिक विकास व विस्तार हा आमच्या ग्रामीण सेवा अभ्यासक्रमाचा कणा आहे.ग्रामीण महाविद्यालय ही संकल्पना केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे,तर जीवनशिक्षणावर भर देणारी संकल्पना असल्यामुळे आमच्या अभ्यासक्रमाची रचना करताना ग्रामीण प्रश्नांना प्राधान्य,वर्गातील अध्यापनाला प्रत्यक्ष क्षेत्र अनुभवाची जोड व ग्रामीण प्रश्नाबाबत संशोधन व विस्तार कार्यातून ग्रामीण क्षेत्राच्या विकासात मदत या तरतूदी करण्यात आल्या आहेत.

देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांचे मूल्यांकन व मानांकन करणारी NAAC ही स्वायत्त संस्था स्थापन केली आहे.या संस्थेद्वारा आपले मूल्यांकन करुन घेणारे आमचे महाविद्यालय हे संपूर्ण वर्धा जिल्हयातील कला शाखेतील पहिले महाविद्यालय आहे.हे आम्ही अभिमानाने नमूद करतो. NAAC या संस्थेने २००३ साली आमच्या महाविद्यालयाचे मूल्यांकन व २०१० साली पुनर्मूल्यांकन करुन महाविद्यालयाला 'ब' दर्जाचे मानांकन दिलेले आहे.२०१७ ला 'नॅक' ने मूल्यांकन करुन अ श्रेणी दर्जाचे मानांकन दिले आहे.

## शारीरिक शिक्षण व खेळ विभाग उल्लेखनिय कामगिरी :

१) अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धा ०९ विद्यार्थी सहभागी.

३) आंतरमहाविद्यालय स्पर्धेत १७ पदक

४) राज्यस्तरीय स्पर्धेत०५ पदक

५) राज्यस्तरीय स्पर्धेत १७ विद्यार्थी सहभागी

## महाविद्यालयाचे विशेष उपक्रम व सुविधा :

१. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण,संशोधन,रोजगार,समाजसेवा व ग्रामीण विकासाच्या सर्व पैलूंची काळजी घेणारा बी.ए. ग्रा.से. हा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तसेच महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय.

२. स्वयंरोजगार प्रोत्साहन : स्वयंरोजगाराच्या विविध क्षेत्रांची पूर्ण माहिती,त्या दृष्टिने निवड संस्थामध्ये प्रशिक्षणासाठी मदत.

३. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन : बी.ए.(आर.एस.)भाग – १ पासूनच स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्स द्वारा सर्वच स्पर्धा परीक्षांची तयारी.तसेच तज्ञ अध्यापकांचे नियमित मार्गदर्शन.

४. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी,शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम.

५. प्रत्येक विषयात २० टक्के गुण अंतर्गत मूल्यांकनानुसार

६. English Proficiency Course नि:शुल्क उपलब्ध.

७. संगणक प्रशिक्षण :अल्पदरात संगणक प्रशिक्षणाची सोय.

८. वसतिगृह सुविधा : मुलीं करीता प्रशस्त व आधुनिक वसतिगृहाची सोय.

९. आधुनिक उपकरणांनी सुसज्ज व्यायामशाळा.

१०. ग्रंथ सुविधाः होतकरु विद्यार्थ्यांना वर्षभर क्रमिक पुस्तके.

११. शिका आणि कमवा योजना : मुलींसाठी

१२. शिक्षा मंडल, वर्धा द्वारा शिष्यवृत्ती.

१३. श्री.नि.गो.अडबाले यांच्याकडून बी.ए.(ग्रा.से.)अंत्य च्या परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख पुरस्कार.

१४. बी.ए.(ग्रा.से.)अंत्य परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास प्राचार्य डॉ.महादेव नगराळे रोख पुरस्कार.

१५. बारावीच्या परीक्षेत भौतिकशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्व.झाडगावकर स्मृती पुरस्कार.

१६. बारावीच्या परीक्षेत रसायनशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्व.हरिभाऊजी शिंदे स्मृती पुरस्कार.

१७. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी व सर्वांगीण प्रगतीसाठी आखण्यात येणाऱ्या व राबविल्या जाणाऱ्या महत्वाकांक्षी योजना.

१८ .महाविद्यालयातील विभाग निहाय प्रथम विदयार्थ्यांना महाविद्यालया तर्फे पारितोषिक.

१९. बारावीच्या कलाशाखेत इंग्रजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला स्व.शंकरलाल भुतडा स्मृती पुरस्कार.

## महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर लक्षात ठेवावयाच्या बाबी:

१. प्रवेश घेताना ३.५× २.५ सें.मी.आकाराचे दोन फोटो देऊन ओळखपत्र मिळवावे.महाविद्यालयात गणवेश व ओळखपत्र घालणे अनिवार्य आहे.

२. सूचना फलकावर दिलेल्या सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

३. जे विद्यार्थी शिष्यवृत्ती,फी माफीच्या सवलती अथवा आर्थिक सवलतीसाठी पात्र आहेत त्यांनी सूचना फलकावर जाहीर केल्यानुसार निर्देशित मुदतीच्या आत अर्ज कार्यालयात सादर करावे.

४. महाविद्यालयीन शुल्क ठराविक मुदतीच्या आत कार्यालयात जमा करावे.

५. ग्रंथालयाची पुस्तके काळजीपूर्वक वापरावीत व मुदतीचे आत परत करावीत अन्यथा दंड आकारण्यात येईल.

६. विस्तारकार्य,राष्ट्रीय सेवा योजना,खेळ व क्रीडा,राष्ट्रीय कार्यक्रम इ.कार्यक्रमात सहभाग घ्यावा.

७. महाविद्यालयात नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व शिस्तीचे वागणे अनिवार्य आहे.

८. वर्गातील वेळापत्रकानुसार सर्वच तासिकांना उपस्थित राहावे.

९. विद्यार्थ्याने पत्र व्यवहाराकरीता प्रवेश अर्जावर पूर्ण पत्ता व मोबाईल नंबर लिहावा.ज्याद्वारे पत्रव्यवहार करता येईल.

**१०. महाविद्यालय परिसरामध्ये धुम्रपान,मद्यपान व पान तंबाखु सेवनावर बंदी आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला ५००/– रु.दंड आकारण्यात येईल.प्रसंगी प्रवेश रद्द करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.**

**११. महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल फोनचा वापर करता येणार नाही.तसे आढळल्यास ५०० /– रु.दंड आकारण्यांत येईल.**

## नवीन सत्र :

महाविद्यालयाचे नवीन सत्र उन्हाळी सुटीनंतर दिनांक १५ जून २०१९ ला सुरु होईल.तसेच महाविद्यालयाचे वर्ग सत्राच्या पहिल्या दिवसापासून नियमित वेळापत्रकानुसार सुरु होतील.

## प्रवेश धोरण :

स्व.जमनालाल बजाज व तपोधन स्व.श्रीकृष्णदास जाजू यांनी स्थापन केलेल्या शिक्षा मंडल,वर्धा या आमच्या मातृ संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या दि.१८ एप्रिल २००९ च्या पक्र.अशैसं २००९/६३९/प्र.क्र.३९/२००९/का.१ नुसार हिंदी भाषिक अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.करीता या महाविद्यालयातील ५० टक्के प्रवेश महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या हिंदी भाषिक विद्यार्थ्यांकरिता राखीव आहेत.अशा विद्यार्थ्यांना या संबंधित एक प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे लागेल.विशिष्ट मुदतीनंतर हिंदी भाषिक विद्यार्थ्यांकरिता असलेल्या राखीव जागा खुल्या व इतर प्रवर्गातून भरल्या जाईल. **सर्व प्रवेश गुणवत्ता तत्वावर केले जातील.**

## अभ्यासक्रम,विषय आणि प्रवेश पात्राता : (कनिष्ठ महाविदयालय)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात पुढील अभ्यासक्रम शिकविले जातात.

### अ. कला (आर्टस) शाखा :

प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी (मराठी माध्यम)
व्दितीय वर्ष कनिष्ठ महाविद्यालयात १२ वी (मराठी माध्यम)

### ब. विज्ञान (सायन्स) शाखा :

प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी (इंग्रजी माध्यम)
व्दितीय वर्ष कनिष्ठ महाविद्यालयात १२ वी (इंग्रजी माध्यम)

### क. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C.Voctional / MCVC )शाखा :

११ वी व १२ वी (मराठी माध्यम)

### प्रवेश क्षमता :

| अ.क्र. | कला | विज्ञान | H.SC.Voc. |
|---|---|---|---|
| ११वी | १०० | १०० | २० |
| १२ वी | १०० | १०० | २० |

## कनिष्ठ महाविद्यालय :

विषय :–

### अ. कला शाखा :(ARTS STREAM)

१. इंग्रजी (English) २.मराठी (Marathi)
३. अर्थशास्त्र (Economics) ४.सहकार (Co-operation)
५. राज्यशास्त्र (Political Science ) ६.समाजशास्त्र (Sociology)
७. पर्यावरण शिक्षण (Environment Education)

### ब. विज्ञान शाखा : (SCIENCE STREAM)

१. इंग्रजी (English) २. मराठी (Marathi)
३. पदार्थ विज्ञान (Physics) ४. रसायनशास्त्र (Chemistry)
५. गणित (Mathematics) ६. जीवशास्त्र (Biology )
७. पर्यावरण शिक्षण (Environment Education )

## उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C.Voctional/MCVC )

### आवश्यक विषय :

१. इंग्रजी (English) २. मराठी (Marathi)
३. आधारभूत विषय (Foundation Course) ४. पर्यावरण शिक्षण(Environment Education)

### ऐच्छिक विषय :

**पुढीलपैकी कोणताही एक विषय :**

१. बांधकाम तंत्रज्ञान Construction Technology – ३० जागा
२. विदयुत तंत्रज्ञान Electrical Technology – ३० जागा
३. स्वयंचलित तंत्रज्ञान Automobile Technology – ३० जागा

### प्रवेश पात्रता :

शिक्षा मंडल,वर्धा या संस्थेला प्राप्त झालेल्या हिंदी भाषिक अल्पसंख्याक दर्जा विचारात घेऊनच २०१९ –२० या सत्रात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

## ११ वी( कला,विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम)

या वर्गात १० वी एस.एस.सी.ची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी /विद्यार्थीनींना प्रवेश घेता येतो.

किंवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने मान्य केलेल्या वरील परीक्षेस समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी / विद्यार्थीनींना प्रवेश घेता येतो.

## १२ वी (कला,विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम)

वरीलप्रमाणे ११ वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/विद्यार्थीनी प्रवेश घेऊ शकतात.

टीप :

१. महाविद्यालयात विज्ञान शाखेत जे विषय शिकविण्याची व्यवस्था आहे तेच विषय घेउन एच.एच.सी.परीक्षेला (१२ वी )बसावे लागेल.या विषयांखेरीज अन्य विषय घेऊन परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२. विज्ञान शाखेत शिकणाऱ्या व पुढे वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.याकरीता विद्यार्थी ११ व्या वर्गात शिकत असतांनाच त्याने निर्धारीत प्रपत्रात ३१ आक्टोबर पूर्वी अर्ज करावा.जात तपासणीचे कोरे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत.

३. विज्ञान व व्यावसायिक शाखांसाठी नोंदणी केले ल्या विद्यार्थ्यांची एच.एच.सी.परीक्षेला गुणवत्तेच्या आधारावर निवड केली जाईल.

## वरिष्ठ महाविद्यालय :

## अभ्यासक्रम,विषय व प्रवेश पात्राता :

महाविद्यालयात बी.ए.(ग्रामीण सेवा त्रिवर्षीय पदवीअभ्यासक्रम ) मराठी माध्यमातून देण्यात येतो.प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता पुढीलप्रमाणे राहील.

## प्रवेश क्षमता :

| अ.क्र | बी.ए.(ग्रा.से.) भाग १ | बी.ए.(ग्रा.से.) भाग २ | बी.ए.(ग्रा.से.) भाग ३ |
|---|---|---|---|
| | १२० | १२० | १२० |

**बी. ए. (ग्रामीण सेवा) भाग १**

अ. एच.एच.सी.(१२वी) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी /विद्यार्थीनी

किंवा

ब. वरील परीक्षेस,नागपूर विद्यापीठाने मान्य केलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी /विद्यार्थीनी

किंवा

क. पंजाबराव कृषि विद्यापीठाची पदविका परीक्षा

किंवा

ड. पुणे येथील इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनची डिप्लोमा इन एज्युकेशन परीक्षा इंग्रजी या विषयासह उत्तीर्ण विद्यार्थी /विद्यार्थीनी( नागपूर विद्यापीठाचे दि.१६.४.९१ चे पत्र नामांकन/क्रमांक आर./१२२ नुसार)

## बी.ए.(ग्रामीण सेवा) भाग २

अ. बी.ए.(ग्रामीण सेवा) भाग १/बी.ए.भाग १/बी.एस.सी.भाग १/बी.कॉम.भाग १ परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी/विद्यार्थिनी

किंवा

ब. नागपूर विद्यापीठाने मान्य केलेली उपरोक्त समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी/विद्यार्थीनी.

## बी.ए.(ग्रामीण सेवा)अंत्य

अ. बी.ए.(ग्रामीण सेवा) भाग २ परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी/विद्यार्थीनी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार.

किंवा

ब. नागपूर विद्यापीठाने मान्य केलेली उपरोक्त समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी/विद्यार्थीनी बी.ए.(ग्रामीण सेवा) भाग १ ची परीक्षा पूर्ण उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**अनिवार्य विषय** : १) इंग्रजी २)मराठी ३) सामुदायिक विकास व विस्तार

**ऐच्छिक विषय** : ( पुढीलपैकी कोणतेही दोन विषय घेता येतील.)

१) अर्थशास्त्र
४) मराठी वाङ्.मय **(विना अनुदान तत्वावर)**
२) समाजशास्त्र
५) इंग्रजी वाङ्.मय **(विना अनुदान तत्वावर)**
३) सहकार

टीप :

१. इंग्रजी वाङ्.मय व मराठी वाङ्.मय हे दोन्ही विषय एकत्र घेता येणार नाही.तसेच मराठी विषय विनाअनुदान तत्वावर शिकवल्या जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना रु.७५/– प्रतिमाह असे शिक्षण शुल्क दयावे लागेल.

२. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार विषयांचा पर्याय दयावा.महाविद्यालय गुणवत्तेच्या आधारावर अंतिम यादी निश्चित करेल.

३. गुणवत्ता वर्धन कार्यक्रमासाठी वेगळे शुल्क आकारले जाणार नाही.

## बी.ए.(ग्रामीण सेवा) भाग २

**अनिवार्य विषय** : १) इंग्रजी २) मराठी ३) सामुदायिक विकास व विस्तार
४) पर्यावरण शिक्षण

**ऐच्छिक विषय** : बी.ए.(ग्रा.से.)भाग १ मधील विषय
गुणवत्ता वर्धन कार्यक्रमः Computer Literacy Course

## बी.ए.(ग्रामीण सेवा) अंत्य

अनिवार्य विषय : १) इंग्रजी २) मराठी ३) सामुदायिक विकास व विस्तार
ऐच्छिक विषय : बी.ए.(ग्रा.से.)भाग २ मधील विषय
गुणवत्ता वर्धन कार्यक्रम : Competitive Examination Preparation Programme
माध्यम : अभ्यासक्रमाचे व परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

## अ) कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेश घेताना भरावयाच्या शुल्काचा तपशिल

| अ. क्र. | तपशील | कला शाखा ११ वी | | कला शाखा १२वी | | विज्ञान शाखा ११ वी | | विज्ञान शाखा १२वी | | उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम ११ वी | | उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम १२वी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | फी भरणारे | सवलत घेणारे | फी भरणारे | सवलत घेणारे | फी भरणारे | सवलत घेणारे | फी भरणारे | सवलत घेणारे | फी भरणारे | सवलत घेणारे | फी भरणारे | सवलत घेणारे |
| १ | प्रवेश फी | १६/- | -- | -- | -- | १६/- | -- | -- | -- | २०/- | -- | -- | -- |
| २. | टर्म फी | ३२/- | -- | ३६/- | -- | ३२/- | -- | ३६/- | -- | ४०/- | -- | ५०/- | -- |
| ३. | प्रयोगशाळा फी | -- | -- | -- | -- | ७०/- | -- | ७०/- | -- | ८०/- | -- | १००/- | -- |
| ४. | ग्रंथालय सुरक्षा निधी | १०/- | १०/- | -- | -- | १०/- | १०/- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | प्रयोगशाळा सुरक्षा निधी | -- | -- | -- | -- | १५/- | १५/- | -- | -- | १००/- | १००/- | -- | -- |
| ६ | शिक्षण फी | १९२/- | -- | २१६/- | -- | १९२/- | -- | २१६/- | -- | २००/- | -- | २५०/- | -- |
| ७ | संस्था विकास निधी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५००/- | ५००/- | ५००/- | ५००/- |
| ८ | वैद्यकीय तपासणी फी | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- | १०/- |
| | एकूण | २६०/- | २०/- | २६२/- | १०/- | ३४५/- | ३५/- | ३३२/- | १०/- | ९५०/- | ६१०/- | ९१०/- | ५१०/- |

**टिप :**

* १२ वी च्या नवीन विद्यार्थ्यांकरिता प्रवेश फी रुपये १८/- आकारण्यात येील.
* विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सोडल्यानंतर ३ वर्षाच्या आत सुरक्षा राशी अर्ज करुन परत घेऊन जावी त्यानंतर ही राशी परत मिळणार नाही.
* शुल्काचे दरात बदल झाल्यास तो सर्वांना बंधनकारक राहील
* स्कॉलरशीपचे फार्म प्रवेश घेतल्यानंतर भरुन द्यावे लागतील व त्यासाठी लागणारे कागदपत्रे खालीलप्रमाणे द्यावे लागतील.
  १) दहावीची मार्कशिट (झेरॉक्स ) २) टी.सी. (झेरॉक्स) ३) जातीचे प्रमाणपत्र (झेरॉक्स)
  ४) उत्पन्न प्रमाणपत्र (वर्ष २०१८-१९ ) (मुळपत्र) ५) बॅकेचे पासबुकची (झेरॉक्स) ६) आधार कार्ड (झेरॉक्स)

## बी.ए. (ग्रामीण सेवा)

| बी.ए. (ग्रामीण सेवा) प्रथम वर्ष | बी.ए. (ग्रामीण सेवा) व्दितीय वर्ष | बी.ए. (ग्रामीण सेवा) तृतीय वर्ष |
|---|---|---|
| सत्र – एक आणि सत्र–दोन | सत्र–तीन आणि सत्र चार | सत्र–पाच आणि सहा |

## परीक्षा पध्दती :

प्रत्येक विषयाची परीक्षा अंतर्गत मूल्यांकन (२० टक्के) गुण व लेखी परीक्षा (८० टक्के गुण )या पध्दतीने होते.अंतर्गत मूल्यांकन महाविद्यालयातर्फे व लेखी परीक्षा नागपूर विद्यापीठातर्फे होते.अंतर्गत मूल्यांकनाचे गुण लेखी परीक्षेच्या गुणात मिळविले जातात.

(प्रत्येक लेखी सत्रांत परीक्षा ८० गुण व प्रत्येक सत्रातील अंतर्गत मूल्यांकनाचे २० गुण असे प्रत्येक सत्रातील प्रत्येक अभ्यासपत्रिकेचे एकुण १०० गुण )

एकुण फी १०,३४४/– रु. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार फी संरचनेत बदलू होऊ शकतो.

## अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्ती योजना

लाभार्थी : १) मागील परीक्षेत ५० टक्के पेक्षा जास्त गुण असलेले विद्यार्थी
२) पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा कमी असलेले विद्यार्थी

## शिष्यवृत्ती व आर्थिक सवलतीबाबत काही ठळक नियम :

शिष्यवृत्ती,ई.बी.सी. व इतर सवलतीसाठी उत्पन्नाची मर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| Govt.of India Scholarship | | |
|---|---|---|
| EBC | SC ST | OBC VJ,NT SBC |
| 1,00,000 | 2,00,000 | 1,00,000 |

## Freeship (SC,ST,OBC,VJ,NT,SBC)

वरीलप्रमाणे रुपये मर्यादापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना

१. राजर्षी शाहू महाराज छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ति योजना. (उच्च शिक्षण)

२. शिष्यवृत्ती व आर्थिक सवलतीकरीता वर्गातील प्रत्येक विषयाचे उपस्थितीचे प्रमाण किमान ७५ टक्के असणे गरजेचे आहे.उपस्थितीचे प्रमाण कमी असल्यास विद्यार्थी सवलतीस पात्र ठरणार नाही व त्यांना फी भरावी लागेल.

३. ई.बी.सी.व मुलींना मोफत शिक्षण सवलती करीता करावयाचे अर्ज व इतर सवलतीचे अर्ज विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर १० दिवसाचे आत भरुन दयावे.

४. सवलतीचे अर्ज विद्यार्थ्यांनी ठराविक मूदतीत पूर्णपणे भरुन कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५. शिष्यवृत्ति व फ्रीशीप चे अर्ज ऑन लाईन भरावे लागतील.(अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या संपर्कात राहावे.)

६. (Winter Exam.Supplementary Examination) पास केली असल्यास त्याच्या शिक्षणात खंड पडल्याबाबतचे एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेटच्या सहीचे खंड प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे लागेल.अन्यथा त्याचा अर्ज मंजुरीसाठी पाठविला जाणार नाही.

## शिक्षण शुल्क :

संपूर्ण वर्षाकरीता शुल्क रु.८००.०० राहील हे शिक्षण शुल्क दोन सत्रात,समान दोन हफ्यात ४००.०० रु.प्रति सत्र किंवा मासिक ८ समान हफ्त्यात (रु.१००/– )प्रमाणे भरता येईल.

## वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेताना भरावयाचा शुल्काचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | पुर्ण फी भरणारे | ई.बी.सी.धारक | शिष्यवृत्ती धारक |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क | ८००/– | – | – |
| २ | विद्यापीठ नामांकन शुल्क * | १००/– | १००/– | – |
| ३ | विद्यापीठ वार्षिक शुल्क | १२५/– | १२५/– | – |
| ४ | विद्यापीठ क्रीडा शुल्क | २५/– | २५/– | – |
| ५ | विद्यापीठ विद्यार्थी संघ निधी | ५/– | ५/– | – |
| ६ | विद्यापीठ विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी | ५/– | ५/– | – |
| ७ | विद्यापीठ विद्यार्थी सहायता निधी | ५/– | ५/– | – |
| ८ | विद्यापीठ विद्यार्थी कल्याण निधी | ५/– | ५/– | – |
| ९ | विद्यापीठ अश्वमेध यज्ञ शुल्क | ३०/– | ३०/– | – |
| १० | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी फार्म शुल्क | ५/– | ५/– | – |
| ११ | विद्यापीठ ई सुविधा शुल्क | ५०/– | ५०/– | – |
| १२ | विद्यापीठ डिझास्टर मॅनेजमेंट फंड | १०/– | १०/– | – |
| १३ | विद्यापीठ पर्यावरण शुल्क | १०० /– | १००/– | – |
| १४ | विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | १०/- | १०/- | - |
| १५ | महा. वैद्यकीय परीक्षा शुल्क | ४० /– | ४०/– | – |
| १६ | महा.शारीरिक कार्यक्षमता चाचणी शुल्क | ४० /– | ४०/– | – |
| १७ | महा.विद्यार्थी सहायता निधी | ६० /– | ६०/– | – |
| १८ | महा.ग्रंथालय शुल्क | २००/– | २००/– | – |
| १९ | महा.क्रीडा शुल्क | २४० /– | २४०/– | – |
| २० | महा.पाठ्य विषयत्तर शुल्क | ८०/– | ८०/– | – |
| २१ | महा. वार्षिकांक शुल्क | १००/– | १००/– | – |
| २२ | महा.परीक्षा शुल्क | ५०/– | ५०/– | ५०/– |
| | एकुण शुल्क | २,०८५/– | १,२८५/– | ५०/– |

## महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता :

टीप – १. नागपूर विद्यापीठ अथवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या व्यतिरीक्त अन्य संस्थेतून किंवा विद्यापीठातून पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२००/– Immigration Fee म्हणून द्यावे लागेल.

२. विद्यापीठ संबंधित असणारे शुल्क यामध्ये विद्यापीठ नियमान्वये कोणत्याही प्रकारची वाढ झाल्यास ते शुल्क देणे विद्यार्थ्यासाठी बंधनकारक राहील.

३. बी.ए.भाग १ ते भाग ३ (ग्रामीण सेवा )पर्यंतच्या वर्गाचे वार्षिक शिक्षण शुल्क रु.८००/– राहील. समान दोन हफ्यात ४००/–रु. प्रति सत्र किंवा मासिक ८ समान हफ्यात १०० प्रमाणे करता येईल.

४. सवलत नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रवेश घेताना दयावा लागेल आणि उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यांना माहे.ऑगस्ट पर्यत जमा करणे अनिवार्य राहील.

५. विद्यापीठ पर्यावरणशास्त्र शुल्क भाग – २ करीता विद्यापीठ नियमानुसार राहील.

६. इंग्रजी वाड्.मय व मराठी वाड्.मय या विषयाची फी रु.७५/– प्रति माह किंवा रु.७५०/– प्रति वर्ष प्रमाणे आकारण्यात येईल.

७. विद्यापीठ नामांकन फार्म शुल्क रु.१०/– प्रवेश घेतेवेळी दयावे लागेल.

८. वरील फी संरचनेत बदल होऊ शकतो.

## विद्यार्थी सहायता निधी :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार गरीब गरजु पात्र विद्यार्थीना,विद्यार्थी सहायता निधीतून आर्थिक साहय दिले जाते.

## शुल्क परत करण्यासंबंधी नियम :

१. प्रवेश घेताना भरलेले प्रवेश शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.

२. सुरक्षा निधी खाली नमूद केले ल्या अटीनुसार परत केल्या जाईल.

अ) संस्था कायमची सोडून जाताना (इतर सर्व राशी भरली असल्यास )

ब) संस्था कायमची सोडल्यानंतर तीन वर्षाच्या आत सुरक्षा निधीची राशी परत मिळण्याबाबत अर्ज केल्यास (३ वर्षानंतर राशी मिळणार नाही.)

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :

प्रवेश घेण्यासाठी आवेदन पत्राद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.आवेदन पत्र माहितीपत्राकासोबत जोडलेले असून महाविद्यालयाच्या कार्यालयात २०/– रु.मिळू शकेल.

१. विद्यार्थी पूर्वी शिकत असलेल्या संस्था प्रमुखाच्या सहिचा संस्था सोडल्याचा दाखला.(T.C. )

२. पात्रता परीक्षेची गुणपत्रिका

३. चारित्र्य प्रमाणपत्र

४. खेळ,क्रीडा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम,एन.सी.सी.,ए.सी.सी.स्कॉउट,ड्राईंग परीक्षा इ.प्रमाणपत्र

५. मध्यंतरी शिक्षणात खंड पडला असल्यास तसे ( Gap Certificate )प्रमाणपत्र

६. (Attempt Certificate) आवश्यकता असल्यास

७. जातीचा दाखला झेरॉक्स प्रत

८. आधारकार्डची झरॉक्स प्रत.

## महाविद्यालयात प्रवेशसंबंधी सूचना:

अ .अल्पसंख्याक दर्जा प्राप्त महाविद्यालयाच्या ठराविक प्रवेश नियमाप्रमाणे प्रवेश दिले जातील. निवड करतांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागा Reservation Position नुसार भरल्या जाईल.

ब. प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

क. प्रवेशित विद्यार्थ्यानी निर्धारीत तारखेच्या आत निर्धारित केलेली राशी व अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती कार्यालयात सादर कराव्यात.निर्धारीत मुदतीच्याआत शुल्क व प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश रद्द समजण्यात येईल.

ड. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकाचा पत्ता असलेले दोन कोरे अंतर्देशीय पत्रे सादर करावेत. वरील पत्रे हे कमी उपस्थितीची पूर्व/अंतिम सूचना देण्यासाठी वापरण्यात येईल.

**टिप : मुळ प्रमाणपत्रे सादर करण्यापूर्वी त्यांच्या पुरेशा सत्यप्रती काढून विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ ठेवाव्या.मूळ प्रमाणपत्रे एकदा सादर केल्यानंतर ती विद्यार्थ्यांना परत दिली जाणार नाही.**

## कनिष्ठ आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांना लागू होणारे नियम:

अ. **ओळखपत्र :** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे.हे ओळखपत्र ३.५ ग २.५ सें.मी.आकाराचे दोन फोटो कार्यालयात देऊन मिळवता येईल.महाविद्यालयात असताना दररोज हे ओळख पत्र प्रत्येक विद्यार्थ्यांना लावणे अनिवार्य आहे.मूळ ओळखपत्राची त्याऐवजी दुय्यम प्रत तयार करावयाची असल्यास २०/– शुल्क आकारण्यात येईल.

ब. **गणवेश :** सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाद्वारे निर्धारित गणवेशातच महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

मुले – निळी फुलपॅन्ट व पांढऱ्या निळया रेषांचे शर्ट

मुली – निळी सलवार,निळी ओढणी,पांढऱ्या निळया रेषांचा कुर्ता.

क. **उपस्थिती –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ व नागपूर विद्यापीठ यांच्या नियमानुसार प्रत्येक विषयातील उपस्थितीचे प्रमाण कमीत कमी ७५ टक्के असणे आवश्यक आहे.

## महाविद्यालयाची वेळ :

महाविद्यालयाचे वर्ग एकच पाळीत चालविले जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ महाविद्यालय | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |
| २. | कनिष्ठ महाविद्यालय | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |
| ३. | उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational / MCVC) | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |

## महाविद्यालयाची कार्यालयीन वेळ :

सुटीचा दिवस वगळता कार्यालय सकाळी ९.४५ ते ५.३० या कालावधीत सुरु असते.

## सूचना फलक:

प्रवेश शैक्षणिक शुल्क,शिष्यवृत्ती इतर सवलत,महाविद्यालयीन परीक्षा,बोर्ड व विद्यापीठ परीक्षा महाविद्यालयीन उपक्रम,स्पर्धा व अन्य बाबींसाठी पूर्ण माहिती सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते.प्रत्येक विद्यार्थ्याने सूचना फलकाकडे नियमितपणे लक्ष देणे आवश्यक आहे.कोणत्याही गोष्टी विषयी मला माहिती नव्हती, अशी सबब ऐकूण घेतली जाणार नाही.

## अनुशासन व आचारसंहिता:

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे व त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी,प्राध्यापक व कर्मचारीवर्ग यांच्याशी आदरपूर्वक व सभ्यतेची वागणूक ठेवावी.

२. महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपर्वक वापरावी,हेतुपरस्पर मालमत्तेची हानी करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. असे आढळल्यास त्याकरीता दंड आकारण्यात येईल.

३. महाविद्यालयातर्फे आयोजित विविध कार्यक्रमात व उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घ्यावा.

४. विद्यार्थ्यांनी तास सुरु होण्यापूर्वी वर्गात उपस्थित राहावे.

५. महाविद्यालयात वेळोवेळी श्रमसंस्कार कार्यक्रम आयोजित केले जातात.त्यात प्रत्येक विद्यार्थ्याला भाग घ्यावा लागेल.

६. विद्यार्थ्यांना दररोज प्रत्येक विषयाच्या तासिकेला हजर राहणे बंधनकारक आहे.त्याचप्रमाणे प्रत्येक विषयाची ७५ टक्के उपस्थिती असणे बंधनकारक आहे.अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही व त्याला कोणत्याही शैक्षणिक सवलतीचा लाभ मिळणार नाही.

७. महाविद्यालयीन शिस्तीचे पालन न करणे,महाविद्यालयाचे मालमत्तेस नुकसान पोहचविणे,असभ्य वर्तन करणे, सतत अनुपस्थित असणे,खोटी प्रमाणपत्रे सादर करणे,इ.बाबीं करीता विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे. याबाबतीत प्राचार्यांचा निर्णय अंतिम स्वरुपाचा व विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.

८. महाविद्यालयात ओळखपत्राशिवाय उपस्थित राहता येणार नाही.

९. जे विद्यार्थी तासिकेला अनुपस्थित राहतील त्यांना प्रत्येक तासिकेला १/– रु.प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१०. पालकांना आपल्या पाल्यांबाबत किंवा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी संपर्क साधावयाचा असल्यास ०७१५२ – २३०५१८, २३०११० या दूरध्वनी क्रमांकावर महाविद्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

११. सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन गणवेशात यावे तसेच ओळखपत्र लावून यावे.

## महाविदयालयाचे उपक्रम

### ग्रंथालय व वाचनालय

महाविद्यालयाचे समृध्द ग्रंथालय आहे.त्यात अनेक विषयांचे सुमारे २४,००० ग्रंथ आहेत.विदयार्थ्यांच्या अभिरुचिला योग्य वळण लागावे व अभ्यासाच्या दृष्टिने आवश्यक ते संशोधन कार्य करता यावे या हेतूने सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जातात.ग्रंथालय पूर्णतः संगणीकृत असून बारकोड पध्दतीने ग्रंथांचे देवाण घेवाण केल्या जाते.

### समृध्द ग्रंथालय व वाचनालय :

| | |
|---|---|
| पुस्तक पेढी योजना | निःशुल्क इंटरनेट व ई–मेल सेवा |
| Network Resource Centre(NRC) | झेरॉक्स व प्रिंटिंग सुविधा |
| स्पर्धा परीक्षा साहित्य | स्वतंत्र वाचन कक्ष |
| वाचकांसाठी संगणकीय तालिका(OPAC) | UGC-N-LIST Database |
| ई–जर्नल्स व ई–पुस्तके | वृत्तपत्रे व नियतकालिके |

### संगणक प्रशिक्षण :

गुणवत्ता संवर्धन कार्यक्रमा अंतर्गत बी.ए.भाग दोन च्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण विनामूल्य दिल्या जाईल. ह्या व्यतिरिक्त इतर संगणक कोर्सेस किमान शुल्क भरुन करता येईल.

### विस्तार विभाग :

विस्ताार विभाग हे ग्रामीण सेवा महाविदयालयाचे एक वैशिष्टय आहे.ग्रामीण बांधवांशी संपर्क स्थापित करुन त्यांना ज्ञान देण्याचे कार्य या माध्यमातून विद्यार्थ्यांना करता येते.त्यामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण समस्यांची जाणीव होउन त्यावर उपाय शोधण्याची संधी मिळते.महाविदयालयाच्या विस्तार विभागातर्फे विविध विस्तार विषयक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.विस्तार कार्यासाठी महाविद्यालयाने बाभुळगाव (बाबापूर) हे गांव दत्तक घेतले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) 'रासेयो एकक पुरस्कार प्राप्त पथक':

युवकांच्या अंतर्गत उर्मीचा वापर देशाच्या विधायक कार्यासाठी व्हावा,समाजसेवेच्या माध्यमातून त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास व्हावा श्रमप्रतिष्ठा,देशसेवा ही मूल्ये अंगीकारावी या उद्दिष्टांनी राष्ट्रीय सेवा योजना

तर्फे विविध प्रकल्प/उपक्रम राबविल जातात. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण दिल्या जातात.सर्वोत्कृष्ट स्वयंसेवकाची निवड करुन त्यांना महाविद्यालयाचे सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून पुरस्काराने सन्मानित केले जाते.यातूनच अनेक स्वयंसेवक विद्यापीठस्तरीय,राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरीय पुरस्काराचे मानकरी ठरत आहे.

## माजी विद्यार्थी संघ (Alumi Association):

महाविद्यालयातून पदवीधर झालेल्या व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांशी संवाद,व संपर्क साधणे,त्यांच्या शैक्षणिक संशेधनाचा विषयक,सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा विद्यार्थ्यांना परिचय करुन घेणे.महाविद्यालयाच्या विकासात माजी विद्यार्थ्यांचा सहयोग वाढविण्यासाठी माजी विद्यार्थी संघ कार्य करतील.

## करिअर गाईडंस व कौन्सिलींग सेंटर (Career Guidance and Councling Center) :

आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आपले स्थान निर्माण करण्यासाठी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम नोकरीच्या संधी.स्वयंरोजगार याबद्दल केंद्राद्वारे मार्गदर्शन केले जाते.

## वादविवाद व वक्तृत्व विकास मंडळ (Debate Elocuation Society) :

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी वक्तृत्व विकास मंडळाच्या वतीने विविध परिसंवाद व वादविवाद स्पर्धाचे आयोजन केले जाते.

## चतुविद प्रकल्प

या योजनेअंतर्गत निरंतर शिक्षण,सामाजिक सर्वेक्षण इ.कार्यक्रम राबविण्यात येतात. लोकसंख्या वाढ व त्याचे परिणाम याबाबत विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली जाते.

## मराठी भाषा मंडळ (Marathi Language Club) :

मराठी भाषा व मराठी साहित्याची अभिरुची वाढावी साहीत्याची बहुश्रुतता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, यासाठी विविध स्पर्धा परिसंवाद,निबंध वाचन,काव्यवाचन,व्याख्याने यांचे आयोजन या मंडळाद्वारे केले जाते.

## इंग्रजी भाषा मंडळ (English Language Club) :

इंग्रजी भाषा व इंग्रजी वाड्.मयाच्या विद्यार्थ्यांकरीता या मंडळाद्वारे कार्यक्रम आयोजित केले जातात.

## इंग्रजी भाषा प्रयोगशाळा (English Language Lab) :

विद्यार्थ्यांचे इंग्रजी संवाद कौशल्य व भाषिक कौशल्य वृध्दीगंत करण्यासाठी विद्यार्थ्यांना संगणकाच्या साह्याने विनामूल्य प्रशिक्षण दिले जाते.

## महाविद्यालय वार्षिकांक (College Magazine):

विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा त्यांच्या भावनांना व वैचारितेला उत्तेजन मिळावे,यासाठी दरवर्षी महाविद्यालयाचा वार्षिकांक प्रकाशित केला जातो.या वार्षिकांकामधून विद्यार्थ्यांचे

लेख,कथा,कविता प्रकाशित करण्यात येतात.

## पालक – शिक्षक संघ (Parents Teacher Forum):

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद राखणे आवश्यक आहे.पालकांच्या सूचना,त्यांच्या समस्या यांची नोंद घेणे व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी पालकाचे सहाकार्य यात अपेक्षित आहे.

## कौशल्यावर आधारीत उपक्रम ( कमवा आणि शिका) (Skill Based Activities) :

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासाच्या दृष्टिकोनातून कौशल्यावर आधारीत विविध उपक्रम राबविले जातात.त्यामध्ये गांडुळ खत निर्मिती,कम्पोस्ट खत निर्मिती,पूनीचे हार इत्यादिंचा समावेश आहे.या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये कौशल्य विकसीत करुन स्वयंरोजगाराकडे त्यांना प्रोत्साहित केले जाते.

## प्रश्न मंजुषा (Quiz):

विद्यार्थ्याचे सामान्य ज्ञान वृध्दिगंत व्हावे,स्पर्धा परीक्षांची आव्हाने स्वीकारण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी.यादृष्टिने महाविद्यालयात उपक्रम राबविला जातो.

## सांस्कृतिक उपक्रम मंडळ (Cultural Society):

विद्यार्थ्याच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी सांस्कृतिक उपक्रमाची आखणी या मंडळाद्वारे केली जाते,संगीत,चित्रकला,परिसंवाद,वादविवाद व वक्तृत्व याबाबत विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते.

## कृषी अभ्यास मंडळ :

शेतीविषयक अद्ययावत तंत्रज्ञान,कृषी पूरक व्यवसायाचे व्यवस्थापन,सेंद्रीय शेती,शाश्वत शेती,गांडुळखत,कंपोस्टखत,दुग्ध व्यवसाय,शेळी–मेंढी पालन,मधुमक्षिका पालन,वनशेती, फुलशेती, फळशेती,भाजीपाला लागवड,बिजोत्पादन तंत्रज्ञान,हरितगृह,कृषि प्रदर्शनी आणि प्रयोगशील कास्तकारांच्या शेती भेटी,कृषीतज्ञांची व्याख्याने,इ.उपक्रमांबाबत विदयार्थ्यांना कृषी अभ्यास मंडळामार्फ त मार्गदर्शन दिले जाते.

## विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ :

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा अधिनियमानुसार गठीत.या मंडळाच्या वतीने वर्षभर विद्यार्थ्याच्या बौध्दीक,शारीरिक आणि कलाविषयक गुणांचा विकास साधण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे व प्रवृत्तीचे आयोजन केले जाते.

## विद्यार्थीनी मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष :

महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थीनी व कार्यरत महिला कर्मचाऱ्यांच्या समस्यांकरीता महिला कक्ष गठीत केलेला आहे.याद्वारे त्यांच्या समस्यांचे निराकरण व विभिन्न मुद्दयांवर समुपदेशन केल्या जाते.

## शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग :

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण – घडण करण्याचे कार्य हा विभाग करीत असतो.महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर,क्रीडांगणे,आधुनिक क्रीडा साहित्य सामुग्री इ.घटक विद्यार्थ्यांना प्रेरक ठरणारे आहे.

महाविद्यालया तर्फे घेण्यात येणाऱ्या शारीरिक शिक्षण वर्गामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे.परीक्षेला पात्र ठरण्यासाठी शारीरिक शिक्षण वर्गातील ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

## विद्यापीठ स्तरावर सहभागी होणाऱ्या खेळाडूंना अतिरिक्त गुण पुढीलप्रमाणे राहतील.

अ) आंतरमहाविद्यालयीन स्तर - १० गुण

ब) प्रथम,व्दितीय,तृतीय स्थान प्राप्त - १५ गुण

क) विद्यापीठ संघात सहभागी खेळाडू - २५ गुण

## कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त गुण पुढीलप्रमाणे राहतील.

अ) जिल्हा पातळीवरील स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतिय स्थान प्राप्त विद्यार्थ्यांना ०५ गुण प्राप्त होईल.

ब) विभागीय स्पर्धेत प्रथम , द्वितीय आणि तृतिय स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना १० गुण प्राप्त होईल.

क) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ गुण, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना २० गुण व २५ गुण प्राप्त होईल.

## आधुनिक व्यायामशाळा :

अतिशय अल्पदरात अनेक आधुनिक उपकरणांनी सुसज्ज व्यायामशाळा उपलब्ध आहे.

## विशेष सूचना :

प्रत्येक विद्यार्थ्यास नियमाप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना किंवा खेळ व क्रीडा किंवा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणे अनिवार्य आहे.सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे वार्षिक परीक्षेत प्रोत्साहनपर अधिक गुण दिले जातात.

## विद्यार्थीनींकरीता स्वतंत्र वसतिगृह :

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींकरीता महाविद्यालयाच्या जवळच स्वतंत्र व सुसज्ज वसतिगृहाची व्यवस्था आहे.वसतिगृहाची प्रवेश क्षमता १५० विद्यार्थिनींची आहे.प्रथम अर्ज करणाऱ्या विद्यार्थीनींना नियमानुसार प्रवेश देण्यात येईल.

## विद्यापीठ अनुदानांतर्गत स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन वर्ग :

दरवर्षी नियमित महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( M.P.S.C.) केंद्रीय लोकसेवा आयोग (U.P.S.C.) यांच्या स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी बँक,रेल्वे,इ.स्पर्धा परीक्षेबाबतचे विशेष शिकवणी वर्ग घेतले जातात. हयाशिवाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग आयोजित केले जातात.

## विद्यापीठ अनुदाना अंतर्गत रेमिडीयल कोचिंग :

वरील योजनेअंतर्गत बी.ए.भाग १ च्या विद्यार्थ्यांना निःशुल्क English Proficiency Course शिकविण्यात येतो.हयासाठी महाविद्यालयात सुसज्ज Language Lab ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.इतर विद्यार्थी देखील हया कार्यक्रमात किमान शुल्क भरुन सहभागी होऊ शकतात.या व्यतिरीक्त सामुदायिक विकास व विस्तार या विषयाचे अभ्यासपूरक वर्ग नियमित घेतले जातात.

## रासेयो सांस्कृतिक कलापथक :

महाराष्ट्र लोककला,लोकसंस्कृती,भारतीय संस्कृती यांचा आकृतीबंध स्वीकारुन महाविद्यालयाचे सांस्कृतिक कलापथक विविध सांस्कृतिक उपक्रमाद्वारे ग्रामीण परिसरात जनजागृतीचे व लोकशिक्षणचे प्रभावी कार्य करीत आहे.

## निसर्ग मंडळ : (Nature Club)

माणसाने निसर्गाशी नाते जोडावे,निसर्गातील बदलत्या घडामोडी,निसर्गाचे मानवी जीवनाला मिळणारे योगदान याची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते.उन्हाळ्यामध्ये पक्षी थांबे,जलपात्र,खादयपात्राची सोय करणे,वृक्षसंवर्धन,वृक्षलागवड करणे असे विविध उपक्रम या मंडळाद्वारे आयोजित केले जातात.

## ऑनलाईन टीचिंग – लर्निंग :

ऑनलाईनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना टिचींग –लर्निंगची सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाते. तसेच ऑनलाईनवर मूल्यांकनाकरिता Quiz चा वापर केल्या जातो. त्याचबरोबर विद्यार्थी घरी बसून इंटरनेटच्या सहाय्याने महाविद्यालयाच्या वेबसाईटवरुन विषयानुसार शैक्षणिक साहित्य प्राप्त करुन अभ्यास करु शकतात.

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम :

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान व कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयामार्फत मातृसंस्थेद्वारा अर्थसहाय्य तसेच विद्यापीठ मान्यताप्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात. जसे '' योग विज्ञान'' "Agriculture Input Marketing इत्यादी

# महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक व कर्मचारी वृंद

## प्राचार्य डॉ.पुरुषोत्तम कालभुत

एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी. (मराठी )

एम.ए. (समाजशास्त्र ,राज्यशास्त्र,इतिहास) बी.एड्.

## वरिष्ठ महाविद्यालय

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. आर.के.मुन | एम.ए.,एम–फिल | सहयोगी प्राध्यापक | अर्थशास्त्र |
| श्री.आर.एम.पवार | एम.ए.,एम–फिल | सहायक प्राध्यापक | समाजशास्त्र |
| श्री.एम.टी.माने | एम.ए.,एम–फिल | सहायक प्राध्यापक | इंग्रजी |
| डॉ.आर.आर.देशपांडे | एम.ए.,एम–फिल,सेट,पीएच्.डी | सहयोगी प्राध्यापक | मराठी |
| श्री.एस.एम.सुतार | एम.एस्सी.(कृषी),नेट | सहायक प्राध्यापक | सा.वि. व विस्तार |
| डॉ.व्ही.आर.उगले | एम.लिब.,एम–फिल,पीएच्.डी. | ग्रंथपाल | |
| डॉ.एस.एस.चव्हाण | एम.पी.एड.,नेट,पीएच्.डी. | डायरेक्टर फिजिकल एज्युकेशन | |
| डॉ.आर.आर.चौधरी | एम.एस्सी (कृषी ), नेट, पीएच्.डी | सहायक प्राध्यापक | सा.वि.वि.विस्तार |
| रिक्त | | सहायक प्राध्यापक | सहकार |

## वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकेत्तर वर्ग

| | |
|---|---|
| श्री.एस.व्हि.फुलझेले | अधिक्षक |
| श्रीमती आर.एम.पाटील | प्रमुख लिपिक |
| कु.एस.पी.मोकदम | वरिष्ठ लिपिक |
| रिक्त | कनिष्ठ लिपिक |
| रिक्त | कनिष्ठ लिपिक |
| रिक्त | चतुर्थ श्रेणी कर्मचारी |
| रिक्त | चतुर्थ श्रेणी कर्मचारी |
| रिक्त | चतुर्थ श्रेणी कर्मचारी |
| रिक्त | चतुर्थ श्रेणी कर्मचारी |
| श्री.एस.एस.इंगोले | ग्रंथालय परिचर |

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक वर्ग

## कला आणि विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री.एम.एस.पांडे** | एम.एस्सी.,बी.एड. | अधिव्याख्याता | भौतिकशास्त्र |
| **श्री.पी.बी.बैस** | एम.कॉम.,बी.एड.,एम.एड. | अधिव्याख्याता | समाजशास्त्र व सहकार |
| **श्री.एम.जी.येल्टीवार** | एम.एस्सी.,बी.एड. | अधिव्याख्याता | रसायनशास्त्र |
| **श्री.जी.एच.उपासे** | एम.एस्सी.,बी.एड. | शिक्षण सेवक | गणित |
| **कु.बीना सॅम्युअल** | एम.ए.,बी.एड. | शिक्षण सेवक | इंग्रजी |
| **श्री.एस.पी. धनवीज** | एम.ए.,बी.एड.,एम.एड . | अधिव्याख्याता | अर्थशास्त्र व राज्यशास्त्र |
| **कु. एस.के.वरफडे** | एम.ए., बी.एड., एम.एड. | अधिव्याख्याता | मराठी |
| रिक्त | | अधिव्याख्याता | जीवशास्त्र |

## व्यावसायिक अभ्यासक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| श्री.एस.जी.जांभुळकर | बी.ई. (सिव्हिल) | पूर्णवेळ शिक्षक | बी.एम. |
| श्री.एस.आय.मोहम्मद | डिप.इन इले.इंजि | पूर्णवेळ शिक्षक | एम.आर.ई.डी.ए. |
| श्री.एस.व्ही.महाजन | डिप.इन ॲटो.इंजि | पूर्णवेळ शिक्षक | ए.ई.टी. |
| श्री.आर.जी.वरकल | डिप.इन सिव्हील ए.एम.आय.ई, | पूर्णवेळ शिक्षक ( प्रा.) | बी.एम. |
| श्री.एस.एन.दुधबडे | डिप.इन आटो.इंजि | पूर्णवेळ शिक्षक ( प्रा. ) | ए.ई.टी. |
| रिक्त | डिप.इन आटो.इंजि | पूर्णवेळ शिक्षक (प्रा.) | ए.ई.टी. |

## शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

| | |
|---|---|
| श्री.एस.एम.सपाटे | प्रयोगशाळा सहा यक |
| श्री.एस.ए.आलवाडकर | लिपिक |
| रिक्त | हमाल |

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा

## २०१९–२० शैक्षणिक सत्रातील महाविद्यालयाचे कॅलेंडर

| अ.क्र. विवरण | वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय एमसीव्हीसी |
|---|---|---|
| **जून** | | |
| ✻ शैक्षणिक सत्राचा प्रारंभ विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया | ✻ विद्यापीठाच्या निर्देशानुसार<br>✻ एच.एस.सी.परीक्षेच्या निकालापासून विद्यापीठाने निर्धारित केलेल्या तारखेपर्यंत | ✻ विद्यापीठाच्या निर्देशानुसार एस.एस.सी.परीक्षेच्या निकालापासून २० दिवसापर्यंत<br>एम.सी.व्ही.सी.करीता जि.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी निर्धारित केलेल्या तारखेपर्यंत. |
| IQAC ची सभा | महिण्याच्या शेवटच्या आठवड्यात | |
| प्राध्यापक समितीची सभा | महिन्याच्या पहिल्या आठवडयात | महिन्याच्या पहिल्या आठवडयात |
| **जुलै** | | |
| वाचन जागृती प्रकल्प ग्रंथालयाद्वारे | जुलै ते डिसेंबर | जुलै ते डिसेंबर |
| व्यवसाय जागृती | स्पर्धापरीक्षा केंद्रातील प्रवेश | एम.सी.व्ही.सी.अंतर्गत व्यवसाय शिक्षण जागृती सप्ताह महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात |
| संगणक साक्षरता अभियान | संगणक अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया | संगणक अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया |
| **ऑगस्ट** | | |
| स्थानिय प्रबंध समिती सभा वरिष्ठ महाविद्यालय व शाळा समिती सभा कनिष्ठ महाविदयालय | शिक्षा मंडळाच्या निर्देशानुसार | शिक्षा मंडळाच्या निर्देशानुसार |
| राष्ट्रीय कार्यक्रम | १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन |
| तपोधन श्रीकृष्णदास जाजू जयंती समारोह व राष्ट्रीय | २९ ऑगस्ट २०२० | २९ ऑगस्ट २०२० |
| क्रीडा दिवस, क्रीडा स्पर्धा | नागपूर विद्यापीठाद्वारे निर्धारित निर्धारित वेळापत्रंकानुसार | कनिष्ठ महा.जि.क्रीडा स्पर्धा निर्धारित तारखांनुसार |
| आस्थापनांना भेटी | | एम.सी.व्ही.सी.अंतर्गत स्थानिक आस्थापनांना भेटी |

| अ.क्र. विवरण | वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय एमसीव्हीसी |
|---|---|---|
| **सप्टेंबर**<br>✻ शिक्षक दिन<br><br>✻ सामान्य ज्ञान स्पर्धा<br><br><br>✻ स्कॉलनर टेस्ट सिरिज<br>✻ IQAC ची सभा<br>✻ पाल्यांच्या गैरहजेरी बद्दलची सूचना<br>✻ चर्चा<br>✻ सत्रांत परीक्षा | ✻ ०५ सप्टेंबर २०२०<br>✻ स्वयंशासन<br>✻ शिक्षा मंडल,वर्धा द्वारा आयोजित महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात<br>---<br>✻महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात<br>✻ महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात<br>✻ विद्यार्थ्यांची विषयवार चर्चासत्र<br>सुट्टीपूर्वी प्रथम सत्रात सराव परीक्षा मौखिक परीक्षा व प्रश्नमंजुषा | ✻ ०५ सप्टेंबर २०२०<br>✻ स्वयंशासन<br>✻ शिक्षा मंडल वर्धा द्वारा आयोजित महिण्याच्या तिसऱ्या आठवड्यात<br><br>✻ पहिली स्कॉलर टेस्ट शिक्षा मंडळाने निर्धारित केलेल्यातारखेनुसार<br>✻ महिण्याच्या शेवटच्या आठवड्यात<br><br>✻ सुट्टीपूर्वी प्रथम सत्रात |
| अंतर्गत मूल्यांकनाबाबत विद्यार्थ्यांना सूचित करणे , विषय शिक्षकाकडून मिळालेले गुण जाणून घेणे, अंतर्गत मूल्यांकनाबाबत काही तक्रार असल्यास अंतर्गत मूल्यांकन समितीकडे तीन दिवसात लेखी अर्ज सादर करावा. समिती अर्जाची दखल सात दिवसात घेईल. | | |
| **ऑक्टोंबर – नोव्हेंबर**<br>✻ गीताई मंदिर वर्धापन दिन<br>✻ संत तुकडोजी महाराज पुण्यतिथी दिन<br>✻ माजी विद्यार्थी मेळावा<br>✻ जमनालाल बजाज जयंती | ✻ ७ ऑक्टोंबर<br>✻ ११ ऑक्टोंबर<br><br>✻ महिण्याचा दुसऱ्या आठवड्यात<br>✻ ४ नोव्हेंबर | <br><br><br>--- |
| **डिसेंबर**<br>✻ शिक्षक पालक सभा<br>✻ स्कॉलर टेस्ट सिरीज<br>✻ चर्चासत्र / भेटी<br>✻ IQAC ची सभा<br><br>✻ युवारंग<br>✻ महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा | ✻ महिन्याच्या पहिल्या रविवारी<br>---<br>✻ विद्यार्थ्यांची विषयवार चर्चासत्र<br>✻महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात<br><br>✻ शेवटचा आठवडा<br>✻ क्रीडा विभागाने निर्धारित केलेल्या तारखेनुसार | ✻ महिन्याच्या पहिल्या रविवारी<br>✻ दुसरी स्कॉलर टेस्ट व द्वितीय घटक चाचणी<br>✻ एम.सी. व्ही.सी. विभागाचा जि. व्यवसाय प्रदर्शनीत सहभाग<br>✻ शेवटचा आठवडा<br>✻ निर्धारित तारखेनुसार |
| | | |

| अ.क्र. विवरण | वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय एमसीव्हीसी |
|---|---|---|
| **जानेवारी २०२१** | | |
| ✻ कमलनयन बजाज स्मृती | ✻ २२ व २३ जानेवारी<br>✻ शिक्षा मंडळाद्वारे | ✻ २२ते २३ जानेवारी<br>✻ शिक्षा मंडळाद्वारे |
| ✻ वैद्यकीय तपासणी व शारिरीक क्षमता चाचणी | ✻ क्रीडा विभागाने निर्धारित केलेल्या तारखेनुसार | |
| ✻ पाल्यांच्या गैरहजेरी बद्दलची सूचना | ✻ महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यात | ✻ महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यात |
| ✻ राष्ट्रीय सेवा योजना शिबिर | ✻ निर्धारित तारखेनुसार | ——— |
| ✻ जिजाऊ जयंती | ✻ १२ जानेवारी | ✻ १२ जानेवारी |
| ✻ सावित्रीबाई फुले जयंती | ✻ १३ जानेवारी | ✻ १३ जानेवारी |
| ✻ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | ✻ २३ जानेवारी | ✻ २३ जानेवारी |
| ✻ राष्ट्रीय कार्यक्रम | ✻ २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन ) | ✻ २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन ) |
| ✻ बक्षिस समारंभ | ✻ २६ जानेवारी २०२१ | ✻ २६ जानेवारी २०२१ |
| **फेब्रुवारी** | | |
| ✻ स्थानिय प्रबंध समिती सभा वरिष्ठ महाविद्यालय व शाळा समिती सभा, कनिष्ठ महाविद्यालय | ✻ शिक्षा मंडलाच्या निर्देशानुसार | ✻ शिक्षा मंडळाच्या निर्देशानुसार |
| ✻ कनिष्ठ महा. नागपूर विभागीय मंडळ परीक्षा | ——— | ✻ निर्धारित तारखेनुसार |
| ✻ शिक्षा मंडल, वर्धा द्वारा आयोजित बक्षिस समारंभ | ✻ शिक्षा मंडळाच्या निर्देशानुसार | ✻ शिक्षा मंडळाच्या निर्देशानुसार |
| ✻ जमनालाल बजाज पुण्यतिथी | ✻ ११ फेब्रुवारी | |
| ✻ सत्रांत परीक्षा | ✻ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात | —– |
| ✻ मौखिक परीक्षा / प्रश्नमंजुषा | ✻ महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात | |
| **मार्च** | | |
| ✻ सत्रांत परीक्षा | ✻ निर्धारित तारखेनुसार | ✻ द्वितीय संत्रात परीक्षा |
| ✻ नागपूर विद्यापीठाची परीक्षा | ✻ विद्यापीठ वेळापत्रका प्रमाणे | ✻ महिन्याच्या शेवटी |
| ✻ सेवा शिबिर | ——— | ✻ एम.सी.व्ही.सी. अंतर्गत निर्धारित सेवा शिबिराचे आयोजन |
| IQAC ची सभा | शेवटच्या आठवड्यात | |
| **एप्रिल** | | |
| ✻ प्राध्यापक समितीची सभा | ✻ महिन्याच्या शेवटी | ✻ महिन्याच्या शेवटी |
| ✻ महाविद्यालय वार्षिकांक | ✻ महिन्याच्या शेवटी | ✻ महिन्याच्या शेवटी प्रकाशन |
| ✻ संत तुकडोजी महाराज जयंती | ✻ ३० एप्रिल | |
| **मे** | | |
| ✻ निकाल नियोजन इत्यादी | ✻ पुढील सत्राची पूर्वतयारी व नियोजन | ✻ ११ वी पुढील सत्राची पूर्वतयारी ११ वी चा निकाल. |

Shiksha Mandal's

# Guidance Bureau and Facility Project

website : www.shikshamandal.org/skdj.html

## SENIOR COLLEGE & JUNIOR COLLEGE

1 In order to provide sufficient exposure about the fast developments in the areas of different interests and to provide able guidance to seekers,Shiksha Mandal has equipped its Guidance Bureau for the Students of its colleges. Membership subscription of the Bureau for Shrikrishnadas Jajoo GraminSeva,
Mahavidyalaya,Pipri -Wardha is fixed at Rs.100/- Senior college and Rs.150/-Junior college per student per academic session. The areas shall include information, knowledge, techniques, opportunities, potentials pertaining to various subjects beyond those covered by syllabus.

Further,optional facilities like Internet Facility,Gymnasium,Health Insurance,
Generator Facility.Reading Room facility,Secured parking,Stationery emblems/pins/buttons,storage etc.could be availed at reasonable cost.

2. Any variance in the fees,permitted by the relevant authority shall be applicable to each student admitted in the college.

# रॅगींग अंतर्गत येणारे वर्तन

Under Section 26(1 (g )of the University Grants Commission Act.1956 मधील कायदेशीर तरतूद १७ जुन२००९ च्या यु.जी.सी.च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्याचे खालील प्रकारचे वर्तन रॅगींग समजले जाईल.

१. चिडविणे,डिवचणे,शाब्दिक,कृती,चिठ्ठी–पत्र अशा लिखित स्वरुपात व मोबाईल वा फोन मेसेज इ.दवारे घडलेले वर्तन.
२. शिवीगाळ करणे व शारीरिक दुःखापत होईल असे कोणतेही वर्तन.
३. व्यक्तीगत शेरेबाजी–नावाचा अपभ्रंश करुन किंवा टोपण नावाने आवाज देणे.
४. इच्छेविरुध्द काही गोष्टी करावयास लावणे.
५. इतरांना शारीरिक व मानसिक आघात पोहचेल असे कोणतेही कृत्य.
६. अप्रतिष्ठादर्शक शब्दाचा वापर.
७. धमकी देणे,भीती दाखविणे,शिवी देणे.
८. कोणत्याही विद्यार्थ्याला लाज वाटेल असे शारीरिक व मानसिक कृत्य करावयास लावणे.
९. शैक्षणिक कार्य करण्यापासून परावृत्त करणारे कोणतेही वर्तन.
१०. स्वतःचे काम दबावाने,बळजबरीने इतरांकडुन करवून घेणे.
११. आर्थिक भुर्दंड (खर्च येईल) पडेल असे किंवा आर्थिक पिळवणुक होईल असे कोणतेही कार्य जबरदस्तीने करावयास भाग पाडणे.
१२. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास घटविला जाईल असे कोणतेही कृत्य .
१३. विद्यार्थ्यास आत्महत्सेस प्रवृत्त करणारे कोणतेही वर्तन.
१४. याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याचे अन्य विद्यार्थ्यासाठी त्रासदायक ठरणारे कोणतेही वर्तन.

**रॅगींग व रॅगींग–सदृश्य वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यास छळ प्रतिबंध कायदा १९९८ नुसार खालील प्रमाणे शिक्षा होवु शकते.**

१. एक ते दोन वर्षासाठी महाविद्यालयातुन नाव काढुण टाकणे व टी.सी.वर गैरवर्तन असा उल्लेख करणे.
२. २.५ लाख रुपये पर्यंत आर्थिक दंड.
३. महाविद्यालयातून निष्कासन व आर्थिक दंड किंवा दोन्ही शिक्षा
४. पोलीस स्टेशनला तक्रार (FIR )दाखल करणे.
५. कायम स्वरुपात महाविद्यालयातून काढून टाकणे.
६. पुढच्या वर्गात प्रवेश नाकारणे.

**तक्रार कोठे नोंदवाल ?/संपर्क (I )Anti-Ragging Squad**

१) प्रा.डॉ.सुशिल चव्हाण ९३२५०९४९५०
२) डॉ.वैशाली उगले ९९२२७८४३८४
३) श्री.एस.व्ही.फुलझेले ९८९०२९२७६१
४) प्राचार्य,श्री.जा.ग्रा.सेवा महाविद्यालय,पिपरी – वर्धा. ०७१५२-२३०५१८/२३०११०
५) महाविद्यालय कार्यालयात लावलेल्या सूचना/तक्रार पेटीत लेखी स्वरुपात विद्यार्थ्याला आपली तक्रार देता येईल.अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांना वरील कोणासोबतही संपर्क साधता येईल.

(I) All India Anti-Ragging Helpline No. 1800-180-5522 or 155222



# विद्यापीठ गीत

## या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ............

या भारताता बंधुभाव नित्य वसु दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे
मतभेद नसू दे ॥ धृ. ॥

नांदात सुखे गरीब अमिर एकमतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्यसुखा या सकळामाजी वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ १ ॥

सकळांस कळो मानवता राष्ट्रभावना ।
हो सर्वस्थळी मिळूनी समुदाय प्रार्थना ।
उदयोगी तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळ –निंदका – मनीही सत्य– न्याय वसू दे।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

सौदर्य रमो घरघरांत स्वर्गि ज्यापरी ।
ही नष्ट होउ दे विपत्ती भीती बोहरी ।
तुकडयास सदा सर्वदा सेवेत कसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

**– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

**मतशक्ती** *"Your Vote your Power Your Future "*

## टिपणी

## श्री देवीदास ज. हातेकर ग्रंथालय, पिपरी–वर्धा

B.T.No. ______

**ग्रंथालय सभासद अर्ज सत्र २०२०-२१**

फोटो

विद्यार्थ्याचे नांव : ____________________

पत्र व्यवहाराचा पत्ता : ____________________

____________________

टेलिफोन क्रमांक :........................ मोबाईल क्रमांक :........................

वर्ग :..................विभाग :................ जन्म दिनांक : ..........................

____________ ____________

विद्यार्थ्याची स्वाक्षरी ग्रंथपाल स्वाक्षरी

---

## IDENTITY CARD INPUT DATA

## FORM

फोटो

PLEASE FILL ALL THE INFORMATION IN CAPITAL LETTER

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| FRIST NAME | | | | | | | | | | | | | | | | |
| FATHER NAME | | | | | | | | | | | | | | | | |
| SURNAME | | | | | | | | | | | | | | | | |
| D.O.B | | | | | | BLOOD GROUP | | | | | | | | | | |
| CLASS | | | | | | Date of Admission | | | | | | | | | | |
| ADDRESS | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| CONTACT NO. | | | | | | | | | | | | | | | | |
| I.D. NO. | | | | | | | | | | | | | | | | |
| Aadhar NO. | | | | | | | | | | | | | | | | |



युवारंग समूहनृत्य



रासेयो शिबिर पानवाडी, प्रबोधनात्मक सामाजिक कार्यक्रम



व्यवसाय शिक्षण – जागृती अभियान



रक्तदान शिबिर




वृक्षारोपण



रासेयो विशेष शिबिर पानवाडी– श्रमसंस्कार



ग्रंथ प्रदर्शनी



विद्यापीठस्तरीय स्पर्धेत पुरस्कार प्राप्त विद्यार्थी




समृध्द ग्रंथालय



आंतरराष्ट्रीय योग दिवस



संगणक प्रयोगशाळा



आधुनिक व्यायामशाळा



मुलींचे वसतिगृह

**प्रकाशक : प्राचार्य, श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा.**

पुस्त–प्रेष

प्रति,
श्रीमान ______________________

______________________

प्रेषक :–
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी–वर्धा
फोन नं. (०७१५२) २३०५१८,२३०११०

मूल्य : २०/-